



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

जीवन म्हणजे एक उघडं आकाश,
जिथे विचारांची भरारी उंच आहे
खास,
सकारात्मकतेने चाललं तर,
आयुष्याचं प्रत्येक क्षण
सुंदर आणि महान आहे...


वर्ष : ०५ | अंक : ८८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.११ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# लालकिल्ला परिसरात भीषण स्फोट, १३ जणांचा मृत्यू, अनेक जखमी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, दिल्ली :** दिल्लीमध्ये लाल किल्ल्याच्या मेट्रो स्टेशनजवळ आज मोठा स्फोट झाला आहे, या स्फोटामुळे परिसरात एकाच गोंधळ उडाला, नागरिकांची धावपळ उडाली, स्फोटामुळे लोकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार या स्फोटामध्ये १३ जणांचा मृत्यू झाला आहे. या ठिकाणी पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या एका कारमध्ये हा स्फोट झाला आहे. या स्फोटाची तीव्रता एवढी जास्त होती की स्फोटानंतर या पार्किंगमध्ये असलेल्या सात ते आठ गाड्यांनी पेट घेतला, कार जळून खाक झाल्या आहेत. दरम्यान घटनेची माहिती मिळताच



दिल्ली पोलीस तातडीनं घटनास्थळी दाखल झाले असून, हा स्फोट नेमका कशामुळे झाला याचा तपास आता पोलिसांकडून सुरू आहे. या घटनेत आठ जणांचा मृत्यू झाला असून, ३० पेक्षा जास्त जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

लाल किल्ल्याच्या मेट्रो स्टेशनजवळ झालेल्या या स्फोटामध्ये आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. या स्फोटामध्ये ज्यांचा मृत्यू झाला आहे, ते नेमके कोण होते? त्याची माहिती अद्याप समोर आलेली नाहीये, मृतांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे, तर या स्फोटामध्ये अनेकज जण जखमी देखील झाले आहेत. जेव्हा स्फोट झाला तेव्हा ज्या कारमध्ये हा स्फोट झाला त्या कारच्या अगदी जवळ हे व्यक्ती उभे असावेत असा अंदाज आहे.

**● भीषण स्फोट !**

या स्फोटाची तीव्रता प्रचंड होती, ज्या कारमध्ये हा स्फोट झाला त्या कारचा फक्त सागांडा उरला आहे, तर या कारजवळ असलेल्या आणखी तीन कार स्फोटामध्ये जळून खाक झाल्या आहेत. तसेच इतरही सात ते आठ कारचं प्रचंड नुकसान झालं आहे. या स्फोटात आठ व्यक्तींचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. तर अनेक जण जखमी झाले आहेत, दरम्यान या घटनेनंतर आता अग्निशमन दलाच्या आठ गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या आहेत, आगीवर नियंत्रण मिळवण्याचं काम सुरू आहे. हा स्फोट नेमका कशामुळे झाला? याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे.

## गोविंद गोपनपल्ले यांनी भाजपला ठोकला रामराम



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१०, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड भाजपाचे शक्ती प्रमुख गोविंद गोपनपल्ले यांना पक्षात दर्जाहिन वागणूक मिळत असल्यामुळे भाजपाला राम राम ठोकला.

माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण हे ओबीसी चळवळ संपवण्याचा प्रयत्न करत आहेत माझ्या घरी ओबीसीची बैठक झाली त्यावेळी मला खा अशोक चव्हाण यांचा फोन आला होता तेंव्हापासून ते माझ्या बाबतीत गैरसमज करून घेतला आहे. मी ओबीसीचा कार्यकर्ता असून ओबीसी साठीच काम करेल माझ्यावर येणाऱ्या दबावाला मी घाबरत नसून ओबीसीचेच कार्य करण्याकरिता मी भारतीय जनता पक्षाचा व पदाचा राजीनामा देत असल्याची माहिती गोविंद गोपनपल्ले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मुदखेड नगर परिषदेची निवडणूक रणधुमाळणी चालू असतानाच भाजपाच्या कार्यकर्त्यांचा राजीनामा म्हणजे भाजपलाही खिंडार पडण्याची शक्यता आहे इच्छुकांची गर्दी जास्त असल्यामुळे आणि किती जण नाराज होऊन भाजपा सोडतील याची कल्पना करता येत नाही. येणाऱ्या निवडणुकीत गोविंद गोपनपल्ले यांनी त्यांच्या वार्डातील लोकांना विश्वासात घेऊनच हे निवडणूक लढवणार असल्याचे गोपनपल्ले यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आहे.

## अवैध दारू वाहतूक करणाऱ्यांनी सामाजिक कार्यकर्त्यांच्या वाहनाला धडक देत काढला पळ




**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१०, कासा :**

महाराष्ट्र सीमेजवळील दादरा नगर हवेलीमधून महाराष्ट्रात अवैध दारू वाहतुकीचा व्यवसाय दिवसेंदिवस वाढत चालला असून, या दारू माफियांकडून पोलिसांच्या हालचालींना चकवा देत बेदरकार पद्धतीने वाहतूक केली जाते. अशीच एक धक्कादायक घटना कासा पोलीस ठाण्याच्या हद्दीत शुक्रवारी घडली असून, या घटनेने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. प्राप्त माहितीनुसार, कासा येथील सायवन नाक्यावर पोलीस वाहन तपासणी करीत असताना उधवा दिशेने येणारी काळ्या रंगाची टाटा हॅरियर कार (क्रमांक MH 01 DP 4738) भरधाव वेगाने येत होती. पोलिसांनी थांबण्याचे संकेत दिले असता वाहनचालकाने गाडी थांबवण्याऐवजी अचानक यू-टर्न घेत पुन्हा उधवा दिशेने भरधाव गतीने पळ काढला. दारू माफियांच्या हालचालींचा संशय आल्याने कासा पोलिसांनी तात्काळ पाठलाग सुरू केला. मात्र, या गाडीने धरमपूर परिसरात पोहोचताच रस्त्यावर सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी उभी असलेल्या सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाडवी यांच्या स्कॉर्पिओ गाडीला समोरासमोर जोरदार धडक दिली. या धडकेत पाडवी यांच्या वाहनाचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने ते थोडक्यात बचावले.

यानंतर या गाडीने सायवन परिसरातील काही वाहनांनाही धडक दिल्याची माहिती स्थानिकांकडून मिळाली आहे. अखेर सायवन–उधवा रस्त्यावरील रायपूर गावाच्या हद्दीत घनदाट जंगलाचा फायदा घेत दारू माफियांनी गाडी चालू स्थितीत ठेवून पळ काढला. कासा पोलिसांनी ही संशयित गाडी ताब्यात घेतल्यावर आतून मोठ्या प्रमाणावर दादरा नगर हवेली येथून आणलेली दारू आढळून आली. या राज्यात या दारूच्या विक्रीस बंदी असतानाही ती अवैधरित्या विक्रीसाठी आणली जात असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. या प्रकरणी कासा पोलीस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस निरीक्षक अविनाश मांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पंकज चव्हाण व पोलीस कर्मचारी गोवारी पुढील तपास करत आहेत.

या घटनेमुळे पुन्हा एकदा अवैध दारू वाहतूक करणाऱ्या माफियांकडून पोलीस आणि सर्वसामान्यांच्या सुरक्षेला निर्माण झालेला धोका स्पष्टपणे समोर आला आहे. स्थानिक नागरिकांनी अशा घटना रोखण्यासाठी पोलिसांनी अधिक कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## दिल्लीतील स्फोटानंतर संपूर्ण देशात खळबळ, पुणे-मुंबईतही हायअलर्ट जारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, मुंबई :** राजधानी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ एका कारमध्ये भीषण स्फोट झाला आहे. लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ एका पार्क केलेल्या कारमध्ये हा स्फोट झाला. हा स्फोट इतका भीषण होता की, कारने लगेच पेट घेतला तसेच शेजारील दोन ते तीन इतर वाहनांनाही आग लागली. या आगीत तीन ते चार वाहने पूर्णपणे जळून खाक झाली आहेत. या घटनेनंतर दिल्लीसह संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे. त्यामुळे देशातील महत्त्वाच्या शहरांमध्ये हायअलर्ट जारी करण्यात आला आहे.

**“दिल्लीत भीषण स्फोट, १३ जणांचा मृत्यू...**

लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटामुळे संपूर्ण देशात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा स्फोट



इतका शक्तिशाली होता की आसपास २०० ते ३०० मीटर अंतरावर स्फोटाचा आवाज ऐकू गेला. या स्फोटात एकूण १३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच अनेक वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. काही गाड्यांचे फक्त सांगाडे उरले आहेत. त्यामुळे संपूर्ण दिल्लीत हायअलर्ट जारी करण्यात आला आहे.

**“पुणे-मुंबईत हायअलर्ट जारी!**

दिल्लीतील या घटनेनंतर देशातील प्रमुख शहरांमध्ये हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. पुणे मुंबईतही हायअलर्ट जारी करण्यात आला असून सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. देशात इतर ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे. दिल्लीतील स्फोटानंतर केंद्रीय गुप्तचर यंत्रणांकडून हा अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**“स्फोटाचे कारण शोधले जाणार, तपासाला सुरुवात...**

मिळालेल्या माहितीनुसार, सायंकाळी ६.४५ वाजता स्फोट झाला आहे. दिल्लीतील ही घटना समोर आल्यानंतर लगेचच अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. कारमधील स्फोटानंतर आग लागली. हीच आग विझविण्याचा प्रयत्न अग्निशामक दलाकडून केला जात आहे.

दुसरीकडे बॉम्ब शोधक पथकही घटनास्थळी दाखल झाले आहे. कारमध्ये स्फोट नेमका का झाला? यामागे काही घातपाताचा उद्देश तर नव्हता ना? या सर्व प्रश्नांची उत्तरं आता शोधली जाणार आहेत.

## आ. किशोर जोरगेवार यांच्या दिल्लीतील बैठकीनंतर टायगर सफारीच्या प्रकल्पाला गती

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** चंद्रपूरच्या दीर्घ प्रतिक्षेत असलेल्या टायगर सफारी प्रकल्पाला अखेर गती मिळत आहे. नुकत्याच आ. किशोर जोरगेवार यांच्या दिल्ली येथे केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणासोबत झालेल्या सकारात्मक बैठकीनंतर, आज एफ.डी.सी.एम. चे व्यवस्थापकीय संचालक नरेश झुरमुरे यांनी चंद्रपूर येथे विशेष भेट देऊन प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी आ. किशोर जोरगेवार यांच्यासह त्यांनी वन अकादमी लगतच्या टायगर सफारीच्या जागेची पाहणी केली.



यावेळी मुख्य वनसंरक्षक आर.एम. रामानुजम, प्रादेशिक व्यवस्थापक दिव्यभारती एम., विभागीय वन अधिकारी राजन तलमले, विभागीय व्यवस्थापक गणेश मोटकर, सहाय्यक व्यवस्थापक व्यंगटरमण जंगीलवाड यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महिला आघाडी अध्यक्ष छबू वैरागडे, भाजप नेते प्रकाश देवतळे, विधानसभा अध्यक्ष दशरथसिंह ठाकुर, युवा मोर्चा अध्यक्ष मयूर हेपट, प्रदेश निमंत्रित सदस्य तुषार सोम, अजय जैस्वाल, बलराम डोडाणी, श्याम धोपटे, महामंत्री मनोज पाल, रविंद्र गुरुनुले, सविता दंढारे, मंडळ अध्यक्ष स्वप्निल डुकरे, सुभाष अदमाने, अल्पसंख्याक आघाडी अध्यक्ष राशिद हुसेन, महिला अध्यक्ष कौसर खान, सायली येरणे, देवानंद वाढई, श्याम धोपटे, अरुण तिखे, संजय बुरघाटे, संजीव सिंग, कार्तिक बोरेवार, दिनकर सोमलकर, प्रलय सरकार आदींची उपस्थिती होती.

यावेळी वन विभागाच्या विश्राम गृहात झालेल्या बैठकीत टायगर सफारी प्रकल्पाच्या विविध टप्प्यांवर सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर झुरमुरे यांनी अधिकार्यांसह ५१५ हेक्टर क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या या महत्त्वाकांक्षी टायगर सफारीच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी केली. सुमारे ६०० कोटी रुपयांच्या निधीतून उभारला जाणारा हा प्रकल्प चंद्रपूरच्या आर्थिक, पर्यटन आणि पर्यावरणीय विकासाला नवी दिशा देणारा ठरणार आहे. या प्रकल्पामुळे जिल्ह्यात नवीन रोजगारनिर्मिती, पर्यटन वाढ आणि स्थानिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर जगभरातील पर्यटक चंद्रपूरकडे आकर्षित होतील आणि वाघनगरी चंद्रपूरचे जागतिक पर्यटन नकाशावर स्थान अधिक बळकट होईल, असा विश्वास यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला.

हा टायगर सफारी प्रकल्प राज्य शासनाच्या विशेष प्राधान्यक्रमावर असून, लवकरच त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहितीही आ. किशोर जोरगेवार यांनी दिली. सदर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील काम लवकरच सुरू करू, असे यावेळी एफ.डी.सी.एम. चे व्यवस्थापकीय संचालक नरेश झुरमुरे यांनी सांगितले. चंद्रपूर जिल्हा हा वन, वाघ आणि पर्यावरण यांचा संगम असलेला जिल्हा आहे.

येथे उभारण्यात येणारा हा टायगर सफारी प्रकल्प फक्त पर्यटन वाढविणारा उपक्रम नसून, तो चंद्रपूरच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाचा पाया ठरणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे चंद्रपूर शहरातील व्यापारी, हॉटेल उद्योग आणि स्थानिक उत्पादन क्षेत्रांना मोठी चालना मिळेल. त्यामुळे हा प्रकल्प सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केंद्रबिंदू ठरेल, असा विश्वास यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला.




## बांगलादेशात पुन्हा हिंसा

बांगलादेशात पुन्हा एकदा तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. बांगलादेशातील अंतरिम सरकारचे प्रमुख मुहम्मद युनूस यांच्या ग्रामीण बँकेच्या मुख्यालयाबाहेर बॉम्बने हल्ला केला. यामुळे मोठा स्फोट झाला आहे. राजधानी ढाक्यात तणाव वाढला आहे, तुरळक ठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडत असताना हा मोठा हल्ला झाला आहे. त्यामुळे आता देशात पुन्हा देशात हिंसक आंदोलने सुरू होण्याची शक्यता आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**बँकेवर हल्ला, बसेस पेटवल्या !**

मुहम्मद युनूस यांच्या एका सल्लागाराच्या दुकानांसमोरही हल्लेखोरांनी बॉम्ब हल्ला केल्याचे समोर आले आहे. तसेच ढाक्यातील २ बसेसला आग लावण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यांमध्ये कोणीही जखमी झाल्याचे वृत्त नाही. मीरपूर पोलिस ठाण्याच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, 'ग्रामीण बँकेसमोर पहाटे ३:४५ वाजता बॉम्बस्फोट झाला. यामागे कोणाचा हात आहे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. परंतु आम्ही आरोपींचा शोध घेत आहोत. मुहम्मद युनूस यांनी १९८३ साली या ग्रामीण बँकेची स्थापना केली होती, गरिबी निर्मूलन आणि महिला सक्षमीकरणात या बँकेने महत्त्वाचे योगदान दिले होते, यासाठी त्यांना २००६ मध्ये युनूस यांना नोबेल शांतता पुरस्कार देण्यात आला होता. आता याच बँकेला उडवण्याच्या हेतून हल्ला करण्यात आला आहे.

**इतरही ठिकाणी बॉम्बस्फोट**

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी ७:१० वाजता मोहम्मदपूर परिसरातील प्रबर्तनसमोर दोन दुचाकीस्वारांनी कच्चे बॉम्ब फेकले आणि त्यांचा मोठा स्फोट झाला. तसेच शहरातील धनमोंडी परिसरातील दोन ठिकाणी अज्ञात हल्लेखोरांनी बॉम्बस्फोट केले. तसेच इब्न सिना हॉस्पिटलजवळही बॉम्बस्फोट करण्यात आला आहे. त्यामुळे आता देशात पुन्हा एकदा अशांतता निर्माण झाली आहे.

**ओल्ड ढाक्यात गुन्हेगार ठार**

ओल्ड ढाका परिसरातील एका रुग्णालयासमोर ५० वर्षीय लिस्टेड गुन्हेगाराची गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे. हा हल्लेखोर २०२३ मध्ये झालेल्या हल्ल्यातून थोडक्यात बचावला होता. तत्पूर्वी तो अनेक वर्षे तुरुंगात होता. त्याली जामीनीवर सुटका झाली होती, आता त्याची हत्या करण्यात आली आहे.

# शिक्षण दिन ; मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्मदिन

आज ११ नोव्हेंबर आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो कारण आजच्याच दिवशी म्हणजे ११ नोव्हेंबर १८८८ रोजी भारताचे पहिले शिक्षण मंत्री, थोर देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा मक्का येथे जन्म झाला. मौलाना आझाद यांचे मूळ नाव अबुल कलाम मोहिनुद्दीन असे होते.

अबुल कलाम ही त्यांना पदवी मिळाली होती. अबुल कलाम म्हणजे वाचस्पती. पुढे त्यांनी स्वतःच्या नावापुढे आझाद लावले. त्यांचे वडील हे भारतीय होते तर आई अरब होती. अबुल कलाम आझाद यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. अगदी लहान वयातच त्यांनी अरबी, फारसी आणि उर्दू या भाषांचे ज्ञान मिळवले. त्यांना तर्कशास्त्र, तत्वज्ञान आणि गणित विषयांची आवड होती तसेच इस्लाम धर्माचा त्यांना गाढा अभ्यास होता. शिक्षण पूर्ण झल्यावर मौलाना अबुल कलाम आझाद यांनी पत्रकारिता सुरू केली. इंग्रजी सत्तेच्या अन्याय अत्याचाराविरोधात जनजागृती करावी यासाठी त्यांनी अल हिलाल नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून ते इंग्रजांविरुद्ध रान पेटवत असत. त्यामुळे इंग्रज सरकारने त्यावर बंदी घातली. काही दिवसांनी त्यांनी अल बलाग नावाचे दुसरे



साप्ताहिक सुरू केले. ते आपल्या लेखणीतून इंग्रज राजवटीविरुद्ध जनतेला जागृत करीत. मुस्लिम समाजानेही स्वातंत्र्याच्या आंदोलनात



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

भाग घ्यावा यासाठी ते मुस्लिम तरुणांना प्रोत्साहित करीत. अबुल कलाम आझाद यांना इस्लाम धर्माचा गाढा अभ्यास असल्याने त्यांनी आपल्या धर्माची तत्वे शेवटपर्यंत जपली असे असले तरी मानवता हाच खरा धर्म आहे आणि सार्वजनिक ठिकाणी मानवता धर्माचेच आचरण करायला हवे असे ते म्हणत. महात्मा गांधींचे ते सच्चे अनुयायी होते. गांधीजींच्या आदेशानेच त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

पुढे ते काँग्रेसचे प्रमुख नेते बनले. इतकेच नाही तर वयाच्या अवघ्या ३५ वर्षी ते काँग्रेसचे अध्यक्षही बनले. काँग्रेसचे अध्यक्ष बनल्यावर त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्यावर भर दिला आहे. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यात त्यांना अटक झाली. तुरुंगवास झाला पण त्यांनी देश स्वातंत्र्य करण्याचे जे व्रत स्वीकारले त्यातून माघार घेतली नाही. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वातंत्र्य झाल्यावर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात त्यांना शिक्षणमंत्री म्हणून स्थान मिळाले. ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांनाच त्यांच्या शैक्षणिक धोरणात प्राधान्य होते. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे वक्तृत्व प्रभावी होते तसेच ते उत्तम लेखक होते. कुराणाचा अनुवाद केलेला तरजुमानुल कोरोन हा त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. इंडिया विन्स हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले.

मौलाना आझाद यांना परराष्ट्र नीतीचा खूप अभ्यास होता. विशेषतः युरोपच्या तत्कालीन परिस्थितीचे त्यांना खूप ज्ञान होते. ते जितके तल्लख बुद्धीचे होते तितकेच ते मनमिळावू स्वभावाचे होते. लॉर्ड बटमली जे इंग्लंडच्या हाऊस ऑफ लोर्ड्सचे सदस्य होते ते मौलाना आझाद यांच्याविषयी म्हणतात मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते. देश स्वातंत्र्य व्हावा तसेच देशाची अखंडता कायम राहावी यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. १९९२ साली केंद्र सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. मौलाना आझाद यांचे २३ फेब्रुवारी १९५८ रोजी निधन झाले.

**जयंतीदिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!**

# पुरुष महिला भेदभाव नको...

काही दिवसांपूर्वी नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील स्टेडियमवर महिला विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेला नमवत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. त्यामुळे भारतीय क्रिकेट विश्वात मानाचा तुरा रोवला गेला आहे. ५२ वर्षांच्या मेहनीतीचं चिज झालं आहे. असं क्रिकेट विश्वातून बोलले जात असले तरी आजही पुरुष आणि महिला क्रिकेटपटूना मिळणाऱ्या सुविधा, सवलती, मानधन समान नसल्याचे समोर आले आहे. वास्तविक पाहता हे चुकीचे आहे. या घटनेमुळे पुरुष आणि म




हिला असा दुजाभाव केला जातो आहे का ? असा सवाल उपस्थित होतो. आज सर्वच क्षेत्रांत महिला आपल्या कामगिरीने पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून वरचढ ठरल्याचे वेळोवेळी दिसून आले आहे मग असा भेदभाव का ? याचे उत्तर खेळ मंत्र्यांनी दिले पाहिजे. क्रिकेटच्या इतिहासात कदाचित पहिल्यांदाच महिलांच्या एखाद्या मॅचची तिकिटं मिळवणं एवढं कठीण बनलं होतं.

महिला क्रिकेटला असा पाठिंबा मिळणं हे एकप्रकारे बदलाचं लक्षण आहे. या दैदीप्यमान रोमहर्षक महिलांच्या विजयाने तरी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे डोळे उघडतील काय ? कोणताही खेळातील खेळाडू असू देत भारताची ती शान असते त्यासाठी सरकारने आवश्यक त्या सोयीसवलीती, मानधन समान दिले पाहिजे. हा विजय भारतीय महिला क्रिकेटसाठी एक मैलाचा दगड ठरला आहे. या विजयामुळे अनेक तरुण मुलींना क्रिकेट खेळण्याची प्रेरणा मिळेल. यापुढेही भारतीय संघ अशीच कामगिरी करत राहील, अशी अपेक्षा आहे. दीप्ती शर्मा आणि हरमनप्रीत कौर यांच्यासारख्या खेळाडूंनी दाखवलेला आत्मविश्वास आणि जिद्द इतर खेळाडूंसाठी मार्गदर्शक ठरेल. हा विजय केवळ एका स्पर्धेचा नाही, तर भारतीय महिला क्रिकेटच्या उज्वल भविष्याचा संकेत आहे.

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

## एका शेतकऱ्याची व्यथा

बस कर देवा आता,
नको अंत पाहूस...
सुकवलेलं धान्य आमचं,
भिजवून नको देऊस...

ईतभर उरल्या शेतीपायी,
रातदिन आम्ही झिजतो...
काबाडकष्ट करून करून,
रातीला उपाशीच निजतो...

साहेबाच्या दरबारी, झडते
अनुदानाची चर्चा...
हातावर'चं पोट आमचं,
कसा काढू बा मोर्चा...

आत्महत्येचा विचार खुळा,
मनात डोकावून वाहे...
तार अथवा मार तू,
तो तुझा अधिकार आहे...

बायका पोरं संगतीला,
म्हणून लढाई सुरू राही...
अश्रू, वेदने शिवाय देवा,
काही हातात उरत नाही...

कस पाहू ? सांग ना,
वाया जाताना पीक...
पोर फी मागतात शाळेची,
कस सांगू? शाळा शिक...

औषधं, किराणा, जनावरं,
सगळं भात शेतीवर आहे...
नुकसान भरपाईचा क्षुल्लक चेक,
शासन आमच्या मयतावर वाहे...

**कवी. गणेश शेलार.**
**शहापूर (ठाणे)**

## गरीब केवळ..

गरिबांची लागे गरज
मतदानापुरती केवळ
जिंके पर्यत इलेक्शन
भरवे सोन्याचे कवळ

घर ऑफिस कामाला
नोकर असावे जवळ
ते नंतर लांबसोडावेत
नकोशी ढवळा ढवळ

करू द्या साफसफाई
हे शहरदेखणे निर्मळ
कुड्या कच-यासोबत
बाहेर टाका मळ मळ

आंदोलनेमोर्चे रॅलीला
उपयोग असे निव्वळ
गर्दी साठी आवश्यक
गरीबजरुरीचे निखळ

ट्रक भरभरून आणा
भाड्याने मिळे दुर्बळ
लावा गुन्हेगारी लेबल
पुरावे दाखवून सबळ

दंगली साठी हेचंयोग्य
जेल भरो करा सकळ
दारिद्र्य निर्मूलन भले
पांढरेकेल्यावर उखळ

आवश्यक हा चिखल
फुलण्या साठी कमळ
डाग नकोत पडायला
नको अधिक तळमळ

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक वृत्त, अचूक बातमी

# "नोव्हेंबर" गुणवत्ता जागृतीचा महिना

नोव्हेंबर महिना हा 'गुणवत्ता महिना' म्हणून जगभरात साजरा केला जातो. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे विविध क्षेत्रांमध्ये आणि जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये गुणवत्तेचे महत्त्व वाढवणे हा आहे. या महिन्यात गुणवत्ता सुधारणा, कार्यक्षमता वाढवणे आणि गुणवत्तेचे महत्त्व समजून घेणे यावर विशेष लक्ष केंद्रित केले जाते. व्यक्ती आणि संस्थांच्या वाढीसाठी तसेच समृद्धीसाठी गुणवत्तेबद्दल जागरूकता वाढवणे हा या महिन्याचा मुख्य हेतू आहे.

जपानमध्ये १९६० च्या दशकात या महिन्याला 'गुणवत्ता महिना' म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली असे मानले जाते. अमेरिकन सोसायटी फॉर क्वालिटी (अडट) सारख्या संस्थांनी या उपक्रमाला जागतिक स्तरावर प्रोत्साहन दिले.

'गुणवत्ता' या शब्दाचा अर्थ सर्वांपेक्षा सरस असणे असा घेता येईल. तसेच गुणवत्ता म्हणजे सेवा किंवा वस्तू देण्यात असणारी सर्वोत्तमता असा देखील अर्थ होतो. काही वेळा 'गुणवत्ता' म्हणजे सर्वगुणसंपन्नता असेही म्हणता येते.

अर्थात, कोणतीही व्यक्ती, सेवा किंवा वस्तू पूर्णपणे सर्वगुणसंपन्न असू शकत नाही; मात्र व्यक्ती स्वतःला सतत प्रशिक्षित आणि सजग ठेवून गुणवान बनवू शकते.

सदगुण म्हणजे अनेक चांगल्या गुणांचे मिश्रण होय. व्यक्तीच्या बाबतीत त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होणे म्हणजेच गुणवान होणे होय. त्याचे चालणे-बोलणे, वर्तन, कला, कौशल्य, ज्ञान, नम्रता, प्रामाणिकपणा, हुशारी, चलाखी, धीटपणा, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि संयम ‑ या सर्व पैलूंची बेरीज म्हणजे व्यक्तीची गुणवत्ता.

शिक्षणामुळे व्यक्तीची गुणवत्ता हमखास वाढवता येते. एका अशिक्षित व्यक्तीची आणि सुशिक्षित व्यक्तीची तुलना केली




असता दोघांमध्ये गुणवत्तेतील फरक स्पष्ट दिसून येतो.

व्यक्तीची गुणवत्ता आणि त्याची बुद्धिमत्ता यांचा जवळचा संबंध आहे. हावर्ड गार्डनर यांनी बुद्धिमत्तेची व्याख्या करताना म्हटले आहे की आपल्या संस्कृतीच्या चौकटीत ज्याला किंमत आणि मूल्य आहे, अशा एखाद्या वस्तूची किंवा सेवेची निर्मिती करण्याची पात्रता म्हणजे बुद्धिमत्ता होय.

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, बँकिंग, वाहतूक, विमा, सुरक्षितता, मनोरंजन अशा अनेक सेवांमध्ये आपण गुणवत्ता मोजत असतो.

**खालील काही उदाहरणांतून हे स्पष्ट होते.**

१) शेजारी बसलेले दोन मटकी विक्रेते समान दर्जाचा माल विकत होते. मात्र पहिल्या विक्रेत्याकडे ग्राहकांची अधिक गर्दी होती. कारण तो विनम्र, संयमी आणि ग्राहकाभिमुख होता. तो प्रत्येकाशी आदराने बोलत असे आणि महिलांशी बोलताना ताई असा संबोधन वापरीत असे. याउलट दुसरा विक्रेता चिडखोर आणि उद्धट होता. परिणामतः पहिल्याचा व्यवसाय तेजीत गेला. आपले सद्वर्तन हेच आपली गुणवत्ता दर्शवते.

२) मुख्य बाजारपेठेत असलेल्या अनेक हॉटेल्सपैकी एका हॉटेलमध्ये प्रचंड गर्दी होती. कारण तेथील टापटीपपणा, स्वच्छता आणि कर्मचाऱ्यांची आदबीची सेवा. प्रशिक्षित शेफ, सभ्य वेटर्स आणि गुणवत्तापूर्ण खाद्यपदार्थ यामुळे ग्राहक पुन्हा-पुन्हा तेथे येत होते.

३) एका शाळेत प्रवेशासाठी जागेपेक्षा जास्त अर्ज आले होते. कारण त्या शाळेत केवळ अभ्यासक्रम पूर्ण केला जात नव्हता, तर विविध उपक्रम, परकीय भाषा, क्षेत्रभेटी, प्रयोगशाळा व सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्तेचा विकास केला जात होता. त्यामुळे त्या शाळेतील विद्यार्थी दरवर्षी गुणवत्ता यादीत झळकत होते.

४) एका बँकेत एका ग्राहकाचे केवायसी कागदपत्र वारंवार गहाळ होत होते. अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे बँकेची प्रतिमा बिघडली आणि ग्राहकांचा विश्वास उडाला. निष्काळजीपणा आणि निकृष्ट सेवा कोणत्याही संस्थेच्या गुणवत्तेला तडा देतात.

एखादा व्यवसाय, उद्योग किंवा संस्था डबघाईला येण्यामागे सर्वात मोठे कारण म्हणजे गुणवत्तेचा दर्जा घसरणे. म्हणूनच सतत स्व-परिक्षण करणे, ग्राहकांच्या प्रतिक्रिया जाणून घेणे, सुधारणा करणे आणि वेगळा विचार करण्याचे धाडस दाखवणे हे गुणवत्ता वाढवण्याचे मुख्य मार्ग आहेत.

गुणवत्ता ही केवळ वस्तू, सेवा किंवा व्यवसायापुरती मर्यादित नसून ती आपल्या प्रत्येक कृतीत, विचारात आणि वर्तनात असली पाहिजे.

स्वतःची गुणवत्ता वाढवणारा प्रत्येक मनुष्य हा आपल्या समाजाच्या प्रगतीचा शिल्पकार असतो.

चला, या नोव्हेंबर महिन्यात आपण सर्वांनी ठरवू या ‑
दररोज थोडं चांगलं, थोडं अधिक गुणवत्तापूर्ण होऊया !

**- किशोर जाधव,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



## थोडक्यात

### सबर्बन मुंबई कॅडेट व सिनिअर जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन



**अक्षराज : संदीप येवले**

**दि.१०, मुंबई :** २४वी सबर्बन मुंबई सिनिअर जिल्हास्तरीय तायक्वॉंदो स्पर्धाआणि ८वी कॅडेट जिल्हास्तरीय तायक्वॉंदो स्पर्धा सोमवार, दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी साकीनाका येथील सेंट अँथनी हायस्कूलमध्ये आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत सबर्बन मुंबई जिल्ह्यातील अनेक प्रतिभावान खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका लीडा सॅन्टीस,आंतरराष्ट्रीय पुमसे प्रशिक्षक रॉबिन मेंजेस तसेच तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबईचे पदाधिकारी संदीप येवले (अध्यक्ष), संदीप चव्हाण (सचिव), कल्पेश गोलांबडे (खजिनदार) आणि संतोष कुंभार (सदस्य), जगदीशअंचन यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी सर्व मान्यवरांनी खेळाडूंना शुभेच्छा देत प्रोत्साहन दिले. सदर स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते खेळाडू हे आगामी राज्यस्तरीय कॅडेट तायक्वॉंदो स्पर्धेत शिर्डी, अहिल्यानगर येथे सबर्बन मुंबई जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

**सुवर्णपदक विजेते**

पुमसे वैयक्तिक (सिनिअर) :- वंश ठाकूर, मृणाली हरणे
पेअर (सिनिअर) :- वंश ठाकूर, मृणाली हरणे
ग्रुप (सिनिअर मुले) :- आर्यन येवले, दीपेश शिंदे, शुभम दरेकर
पुमसे वैयक्तिक (कॅडेट) :- अभिजीत देदीनाथ, महिमा थापा
पेअर (कॅडेट) :- अभिजीत देदीनाथ, अलिजा शेख
ग्रुप (कॅडेट मुले) :- अथर्व सावंत, साहस भोजे, रुद्र रसाळ
ग्रुप (कॅडेट मुली) :- आद्या शर्मा, अलिजा शेख, महिमा थापा

### श्री.महालक्ष्मी माता मंदिरात ५८ हजार रुपयांची चोरी चांदीच्या पादुका, समई व रोख रक्कम लंपास



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१०, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील शिवापुर (शेळकेवाडी) येथील श्री.महालक्ष्मी माता मंदिरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून चांदीच्या पादुका, पितळी समई तसेच दानपेटीतिल रक्कम असा एकूण सुमारे ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे.फिर्यादी दिनकर पंढरीनाथ जगताप यांनी लासलगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आमचे गावातील महिला राही भाऊसाहेब पवार या दर्शनासाठी गेल्या असता श्री.महालक्ष्मी माता मंदिरात दरवाजाचे कडी कोंयडा तुटलेले दिसले. त्यांनी तात्काळ मला कळवले. मी सोबत निलेश राजाराम जगताप, संदीप प्रकाश मोगल, दत्तु सुभाष जगताप, हेमंत बबन जगताप असे मंदिराकडे गेलो असता दानपेटीचे कडी कोयंडा तुटलेला दिसला तसेच श्री.महालक्ष्मी माता मंदिरात चिटकवलेल्या चांदीच्या पादुका दिसल्या नाहीत. त्यामुळे आम्हाला मंदिरात चोरी झाल्याची खात्री झाल्याने पो.पा.मधुकर डोमाडे व गणेश जगताप यांना माहीती दिली. आम्ही चोरी गेलेल्या मालाचे अवलोकन केले असता, प्रथमदर्शनी ४५ हजार रु.च्या अंदाजे अर्धा किलो वजनाच्या चांदीच्या पादुका, ८ हजार रु.ची पितळी समई, ५ हजार रोख रुपये असा एकूण ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने कोणीतरी अज्ञात चोरट्यांने मंदिराच्या दरवाजा तोडुन चोरी करुन नेला म्हणुन माझी अज्ञात चोरट्याविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. त्यांचे फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात लासलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स.पो.नि.भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पो.कॉ.नवनाथ नाईकवाडे अधिक तपास करीत आहेत.

### शासकीय जिल्हा रुग्णालयातील अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.खाडे निलंबित




**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१०, सातारा :** सातारा येथील क्रांतिसिंह नाना पाटील शासकीय जिल्हा रुग्णालयातील अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.राहूल खाडे यांना आरोग्य विभागाने निलंबित केले असून यामुळे वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. महिलांच्या तक्रारीनंतर त्यांच्यावर कारवाई झाल्याचे सांगण्यात येत आहे. डॉ. राहुल खाडे यांच्याकडे अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक पदाचा पदभार होता. गेल्या दोन वर्षांपासून ते सिव्हिलमध्ये कार्यरत होते. त्यांच्याविषयी महिलेने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे तसेच आरोग्य उपसंचालकांकडे लेखी तक्रार केली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी समिती नेमण्यात आली होती. या चौकशी समितीने सिव्हिलमध्ये येऊन तक्रारीविषयी चौकशी केली होती. संबंधित तक्रारीची चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्याचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला होता. डॉ. राहुल खाडे यांच्या विरोधात काही महिलांनी आपले सरकार पोर्टल वर तक्रार दाखल केली होती. त्या अनुषंगाने तक्रारीचे गांभीर्य ओळखून ही बाब गंभीर स्वरूपाची असून तात्काळ त्यांचे निलंबन करणे हे शासनाला उचित वाटल्याने त्याच्यावर कारवाई करण्यात आली. आता हे निलंबन आदेश जोपर्यंत अंमलात आहेत, तोपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियमामधील तरतुदीनुसार डॉ. राहुल खाडे यांना खाजगी नोकरी स्वीकारता येणार नाही अथवा स्वतःला कोणत्याही व्यापार उद्योगधंद्यामध्ये गुंतवून घेता येणार नाही. जर निलंबनाधीन असताना डॉ. राहुल खाडे यांनी खाजगी नोकरी स्वीकारली अथवा स्वतःला व्यापार किंवा उद्योगधंद्यामध्ये अडकवून घेतले तर त्यांनी गैरवर्तन केल्याचे लक्षात घेऊन ते निर्वाहभत्ता मिळण्यास अपात्र ठरणार आहेत.

## महाबळेश्वर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीसाठी रस्सीखेच







**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१०, महाबळेश्वर (सातारा) :** थंड हवेसाठी प्रसिद्ध असलेले महाबळेश्वर चे राजकारण थंडीत सुद्धा कमालीचे तापले आहे. नगरपरिषद निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला असून महाबळेश्वर नगरपरिषदेवर कोणाची सत्ता येणार याकडे समस्त महाबळेश्वरकरांचे लक्ष्य लागले आहे. ५ वर्षाहून अधिक प्रशासकीय काळ अनुभवल्या नंतर महाबळेश्वरची जनता इच्छुक नगरसेवक उमेदवारां बरोबरच आपल्या हक्काच्या नगराध्यक्ष कधी मिळणार याच्या प्रतिक्षेत आहेत. यातच मतदार यादीमधील तफावत त्यावरील हरकती तर महाविकास आघाडी यांच्या निवडणूक पुढे ढकलण्याच्या मागणी यामुळे निवडणूक पुढे जातील का? या संभ्रमात असतानाच निवडणूक आयोगाकडून अचानक कार्यक्रम जाहीर केली असून संपूर्ण निवडणूक प्रक्रियेसाठी फक्त काहीच दिवसाची कालावधी मिळाल्याने सर्वपक्षीय नेते मंडळींची कार्यकर्त्यांची व इतर इच्छुकांची पुरती धांदल उडाली आहे. नगरपालिकेवरती आपले वर्चस्व स्थापन करण्यासाठी सर्वपक्षीयांनी जोर लावला असून या बाबत बैठकीचे सत्र सुरू आहे. प्रस्थापितांच्या बरोबरच नव्याने इच्छुक उमेदवारांची रांग सर्व पक्षातील स्थानिक प्रमुखांकडे लागली आहे. परंतु पुढील राजकीय गणिते काय असतील कुठल्या प्रभागात कोणाचे वर्चस्व असेल याचा आपल्या पक्षाला आघाडीला कसा फायदा होईल याची गणिते सध्या सुरू असून काही मोजके उमेदवार वगळता कोणताही पक्ष राजकीय आघाडी आपले उमेदवार जाहीर केले नाहीत. यामुळे इच्छुक उमेदवार पक्षाकडून मिळणाऱ्या तिकिटांबाबत चिंतेत असल्याचे पहावयास मिळत आहे. यातून बऱ्याच पक्षांमध्ये नाराजीचे सत्र देखील पाहायला मिळत आहे. बंडखोरी थोपवण्या करिता पक्ष व आघाड्या प्रयत्न करताना दिसत आहेत

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच जिल्ह्याचे पालक मंत्री शंभूराज देसाई यांच्या मार्गदर्शना खाली महाबळेश्वर शिवसेनेची धुरा माजी नगरसेवक कुमार शिंदे, शहर प्रमुख विजय नायडू, हेमंत साळवी यांनी हाती घेतली असून शिवसेना महाबळेश्वर यांच्याकडून नगराध्यक्ष पदासाठी प्रमुख उमेदवार कुमार शिंदे यांचे नाव जाहीर केले असून आगामी निवडणुकीत कुमार शिंदे यांनी युवा व नविण चेहऱ्यांना संधी देण्यावर भर दिला आहे.

राष्ट्रवादी मधील नेतेमंडळींना मदत व पुनर्वसन मंत्री, स्थानिक आमदार मकरंद आबा पाटील राजू शेठ राजपुरे यांची खंबीर साथ मिळत असली तरी देखील स्थानिक नेत्यां कढून नगराध्यक्षपदा बरोबर नगरसेवक पदासाठी प्रस्थापितां बरोबरच इच्छुक उमेदवारांचे प्रभागातील गणित बसवणे अवघड जाताना दिसून येत असून निवडणूक प्रक्रियेसाठी कमी काळ राहिला असून देखील कोणतीच मोर्चे बांधणी होत नसल्याने चिंतेच वातावरण पाहायला मिळत असल्याने मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील महाबळेश्वर राष्ट्रवादी पक्षातील अंतर्गत समस्या मिटवून शिवसेना उमेदवार कुमार शिंदे यांना टक्कर देण्या साठी नगराध्यक्षपदा करिता माजी नगराध्यक्ष किसन शिंदे, नगरसेवक नासीर भाई मुलाणी, नगरसेवक सुनिल शिंदे यापैकी कोणता उमेदवार अंतिम करतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यातच शिवसेना ठाकरे गटाकढून माजी नगरध्यक्ष डी.एम बावळेकर तसेच शिवसेना माजी जिल्हा प्रमुख राजेश कुंभारदरे, सुनील नाना साळुंखे, सचिन वाघदरे यांच्या भूमिके वरती देखील बरीच राजकीय गणिते अवलंबून असून यांच्या मार्फत नगराध्यक्ष पदा साठी कोणता उमेदवार जाहीर होईल याचं बरोबर निवडणुका महाविकास आघाडी मधून लढणार की स्वबळावर लढणार का इतर स्थानिक आघाड्या बरोबर युती करणार हा सध्या चर्चेचा विषय आहे. तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाची भूमिका काय असणार आहे किती जागांसाठी आग्रही असणार आहेत याकडे सर्वांच लक्ष्य लागले आहे.

## नांदुरा कृषी उत्पन्न बाजार समितीत नगरपरिषद निवडणुकीपूर्व शिवसेनेची भव्य बैठक संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, नांदुरा (बुलडाणा) :** नांदुरा कृषी उत्पन्न बाजार समिती येथे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयोजित शिवसेनेची भव्य बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. इच्छुक उमेदवारांची प्राथमिक चर्चा, संघटनात्मक तयारी आणि आगामी नगरपरिषद नांदुरा निवडणुकीसाठीची रणनीती ठरविताना कार्यकर्त्यांचा उत्साह उल्लेखनीय होता. विकासाभिमुख विचारसरणी, जनतेशी थेट संवाद आणि संघटनशक्ती यांच्या जोरावर नांदुरा नगरपरिषदेवर पुन्हा भगवा फडकवण्याचा निर्धार या बैठकीत दृढ झाला.

यावेळी आमदार संजय गायकवाड, विजयजी अंभोरे, संतोष डिवरे, ओमसिंग राजपूत, सुनील जुनारे, विजय साठे, अनिल जोगळे, अनंता शिंदे, प्रज्ञाताई तांदळे, सचिन हेलगे, हरीश कारले, अजय पारस्कर, महेंद्र वानखेडे, भावना सोनटक्के, महादेव काळे, संतोष अवचार, गणेश काळे, दत्ता येनकर, कैलास सुषिर, किसन मानकर, प्रताप जाधव, किसन चंदनशिव, कार्तिक मानकर, युवराज वानखेडे तसेच मोठ्या संख्येने शिवसेना व युवासेना पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान प्रत्येक प्रभागातील स्थानिक प्रश्न, विकास आराखडा, महिला सक्षमीकरण, तरुणांसाठी रोजगारनिर्मिती आणि जनतेशी प्रत्यक्ष संवाद वाढविण्याबाबत आमदार संजय गायकवाड यांनी सविस्तर चर्चा केली. आगामी निवडणूक ही जनतेच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना राबविण्याची संधी आहे, असे सांगून आमदार गायकवाड यांनी सर्व कार्यकर्त्यांना घराघरात जाऊन सरकारच्या योजनांची माहिती पोहोचवण्याचे आवाहन केले.

## पारनेर नगरपंचायतच्या नगराध्यक्षपदी डॉ.विद्या कावरे

### खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब; महाविकास आघाडीची बाजी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने दमदार विजय मिळवला आहे. आघाडीच्या डॉ.विद्या बाळासाहेब कावरे यांनी ११ विरुद्ध ६ मतांनी विजय संपादन करत नगराध्यक्षपद पटकावले. त्यांच्या विजयाने महायुतीच्या राजकीय घोडेबाजाराला चपराक बसली असून, खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाले आहे.

नगराध्यक्ष नितीन अडसूळ यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार, दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी विशेष सभा घेण्यात आली. उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर हे पीठासीन अधिकारी म्हणून उपस्थित होते. हात वर करून मतदान पद्धतीने झालेल्या या निवडणुकीत डॉ. कावरे यांनी विजय मिळवला.

महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी एकदिलाने मतदान करून पक्षनिष्ठा अबाधित ठेवली. नितीन अडसूळ, जायदा शेख, सुरेखा भालेकर, योगेश मते, भूषण शेलार, प्रियंका औटी, निता औटी, सुप्रिया शिंदे, हिमानी नगरे, विद्या गंधाडे आणि स्वतः डॉ. कावरे यांनी मतदान करून डॉ.कावरे यांचा विजय निश्चित केला. विरोधी उमेदवार अशोक चेडे यांना विजय सदाशीव औटी, युवराज पठारे, निता ठुबे, नवनाथ सोबले आणि कांताबाई ठाणगे या नगरसेवकांचा पाठिंबा मिळाला.महायुतीकडून महाविकास आघाडीच्या नगरसेवकांना गळाला लावण्यासाठी' मोठे आर्थिक आमिष दाखवण्यात आले. लाखो रुपयांच्या ऑफर्स देत मतदानावर परिणाम करण्याचे प्रयत्न शेवटच्या क्षणापर्यंत सुरू होते. तरीसुद्धा आघाडीचे नगरसेवक ठाम राहिले. राष्ट्रवादी काँग्रेस गटनेते योगेश मते यांनी शनिवारी ९ नगरसेवकांना व्हिप बजावत डॉ. विद्या कावरे यांनाच मतदान करावे असे निर्देश दिले होते.

या व्हिपचे काटेकोर पालन करत आघाडीने एकजुटीचा नमुना दाखवला. नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर डॉ. विद्या कावरे यांचा नगरपंचायत सभागृहात सत्कार करण्यात आला. समर्थकांनी फटाके फोडत आनंदोत्सव साजरा केला. महाविकास आघाडीच्या या विजयामुळे पारनेरच्या राजकारणात नव्या समीकरणांची चाहूल लागली आहे.

## दिव्यांग क्षेत्रात विना नोंदणी कार्य करणाऱ्या संस्थांवर कारवाई होणार

### समाजकल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, ठाणे :** ठाणे जिल्ह्यासह मुंबई विभागातील विविध जिल्ह्यांमध्ये दिव्यांग क्षेत्रात कार्यरत अनेक संस्था शासनाकडे नोंदणी न करता कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर दिव्यांग कल्याण विभागाने अशा संस्थांवर कायद्यानुसार कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये कार्यरत दिव्यांग संस्थांनी दि.३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य असून सर्व दिव्यांग संस्थांनी नोंदणी पुर्ण करून घ्यावे, असे आवाहन समाजकल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे यांनी केले आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार (Rights of Persons with Disabilities Act, २०१६) कलम ५१ आणि ५२ अंतर्गत, दिव्यांग क्षेत्रात कार्य करावयाच्या सर्व संस्थांनी शासनाकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे.

राज्य शासनाने दिव्यांग कल्याण आयुक्त यांना या अधिनियमांतर्गत सक्षम अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्यांच्या मार्फतच संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र प्रदान केले जाते. या नोंदणीशिवाय कार्यरत राहणे हे कायद्याचे उल्लंघन ठरत असल्याने, कलम ९१ नुसार अशा संस्थांवर दंडात्मक कारवाई होऊ शकते. ठाणे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे यांनी सांगितले की, ठाणे जिल्ह्यात दिव्यांगांच्या पुनर्वसन, शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या सर्व संस्थांनी आपली नोंदणी पूर्ण करावी. विना नोंदणी कार्यरत राहणे हा गंभीर गैरप्रकार आहे. त्यामुळे संबंधित संस्थांनी ३० नोव्हेंबर, २०२५ पूर्वीच आपले प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयात सादर करावेत, अन्यथा कारवाई टाळता येणार नाही. नोंदणीसाठी संस्थांनी संबंधित जिल्ह्यातील दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. प्रस्तावासोबत संस्थेची नोंदणी कागदपत्रे, कार्याचे तपशील, लाभार्थ्यांची माहिती आणि शासकीय नियमांनुसार आवश्यक कागदपत्रे जोडावीत. विना नोंदणी कार्यरत संस्थांवर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ९१ अंतर्गत कायदेशीर कारवाई केली जाणार असून अशा संस्थांना शासन मान्यता, निधी किंवा कोणताही लाभ दिला जाणार नाही.

# म्हसणे फाट्यावर वाहतूक सिग्नल बसवा; खासदार लंके यांची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, अहिल्यानगर :** अहिल्यानगर – पुणे महामार्ग हा जिल्ह्यातील सर्वाधिक वर्दळीचा मार्ग ठरत आहे. या मार्गावरील म्हसणे फाटा परिसर गंभीर वाहतूक समस्येचा केंद्रबिंदू बनला आहे. दररोज हजारो वाहनांची वर्दळ, नियंत्रणाची कमतरता आणि वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर खासदार निलेश लंके यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वाहतूक सिग्नल बसविण्याची मागणी केली आहे.

अहिल्यानगर – पुणे हा केवळ जिल्ह्याचाच नव्हे तर राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग आहे. या महामार्गावर म्हसणे फाटा हे ठिकाण शहर व





ग्रामीण भागात जोडणारे प्रमुख चौक आहे. दररोज सकाळ–संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी येथे वाहनांची संख्या काही हजारांच्या घरात असते. मात्र, सिग्नल व्यवस्था नसल्यामुळे वाहतुकीचे नियंत्रण पूर्णतः कोलमडले आहे. अनेकदा चार दिशांतून वाहने एकाच वेळी रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न करत असल्याने वाहतुकीची कोंडी, आणि अपघातांची शक्यता वाढली आहे.

### पादचारी अपघातांच्या घटना वाढण्याची शक्यता

या चौकातून अनेक शाळा आणि महाविद्यालयांकडे जाणारी वाहतूक होते. त्यामुळे विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना रस्ता ओलांडताना मोठा धोका निर्माण झाला आहे. वाहनांच्या वेगामुळे आणि सिग्नल नसल्याने पादचारी अपघातांच्या घटना वाढण्याची शक्यता वाढली आहे. नागरिकांना सुरक्षितता देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे, त्यामुळे या ठिकाणी वाहतूक सिग्नल त्वरित बसवावेत अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी केली आहे.

## थोडक्यात

### मारुती गवळी यांना वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान




**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.१०, नवी मुंबई :** वसंत डावखरे स्मृती प्रतिष्ठान, भाजपा शिक्षक आघाडी व समन्वय प्रतिष्ठान ठाणे यांच्या वतीने वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार२०२५ सोहळ्याचे दिमाखदार आयोजन मो.ह.विद्यालय ठाणे च्या सभागृहात करण्यात आले होते. यात कोकण विभाग शिक्षक मतदार संघातील ५ जिल्ह्यातील आदर्श संस्थाचालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात नवी मुंबई मनपा शाळा क्रमांक ४० चे प्रभारी मुख्याध्यापक मारुती कोंडीबा गवळी यांना पदवीधर शिक्षक आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते मानाचा वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ देवून सन्मानित करण्यात आले. स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी मंचावर कोकण विभाग शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, भाजपा ठाणे शहर आमदार संजय केळकर, सांस्कृतिक विभागाचे विनय सहस्त्रबुद्धे व भाजपा शिक्षक आघाडीचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. मारुती गवळी हे नवी मुंबई मनपा शाळा क्रमांक ४० चे प्रभारी मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असून अत्यंत शिस्तप्रिय, उपक्रमशील शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून ते परिचित आहेत. त्यांची एकूण सेवा ३३ वर्ष झाली आहे. ते प्राथमिक विभागात कार्यरत असून देखील त्यांनी जवळपास १५ वर्ष नवी मुंबई मनपाच्या माध्यमिक विद्यालयाची धुरा समर्थपणे सांभाळली होती. नवी मुंबई मनपाच्या प्रसिद्ध शाहू महाराज विद्यालयाच्या माध्यमिक विभागाचे जवळपास १० वर्ष प्रभारी मुख्याध्यापक म्हणून अत्यंत प्रभावीपणे त्यांनी कामकाज सांभाळले आहे. त्याच्या कारकिर्दीत विद्यालयास २०१७ चा राष्ट्रीय स्तरावरील ठाणे जिल्ह्यातील पहिला स्वच्छ भारत विद्यालयाचा पुरस्कार प्राप्त झाला होता . त्यांच्या कालवधीत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर रोबोटिक्सच्या संचालन प्रयोग सादरीकरणात फरीदाबाद हरियाना येथे विशेष पुरस्कार प्राप्त झाला होता. त्यांनी मनपाच्या सी बी एस ई शाळा क्रमांक ९४ चे देखील अत्यंत प्रभावीपणे मुख्याध्यापक म्हणून काम पहिले आहे. त्यांच्या शैक्षणिक कामाचा गौरव म्हणून त्यांना या अगोदर नवी मुंबई मनपाच्या माध्यमिक विभागाचा पहिला आदर्श शिक्षक पुरस्कार तत्कालीन मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते देवून सन्मानित करण्यात आलेले आहे. तसेच लायन्स क्लबऑफ वाशी यांच्या वतीने आदर्श शिक्षक, रोटरी क्लब ऑफ नवी मुंबईच्या वतीने नेशन बिल्डर तर अविष्कार फौन्डेशन कोल्हापूरच्या वतीने महाराष्ट्र रत्न पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे. या वसंत स्मृती पुरस्काराने त्यांच्या शिरपेचात आणखी मानाचा तुरा खोवला गेला आहे. या पुरस्काराने त्यांचे महापे येथील शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यावतीने गवळी यांचे विशेष अभिनंदन करण्यात येत आहे.

# म्हाते खुर्दमध्ये विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून वनराई बंधारा

## ग्रामस्थ – शाळांची एकत्रित पर्यावरण चळवळ



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१०, मेढा (सातारा) :** सातारा जिल्ह्यातील मेढा, म्हाते खुर्द, ता.जावली, पर्यावरण संवर्धन आणि जलसंधारणाचा संदेश केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कृतीत उतरवत म्हाते खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेचे व म्हाते बुद्रुक येथील आण्णासाहेब पाटील हायस्कूलचे विद्यार्थी, शिक्षकवर्ग आणि ग्रामस्थ यांनी एकत्र येत सोमवार, दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी यशस्वीपणे वनराई बंधारा उभारला. या लोकसहभागातून उभारलेल्या बंधाऱ्यामुळे पुढील चार महिने गावातील जनावरे, वन्यप्राणी तसेच पक्ष्यांना पाण्याचा मोठा आधार मिळणार आहे. उन्हाळ्यातील पाणीटंचाईच्या झळा कमी करण्यात या उपक्रमाचे मोलाचे योगदान ठरणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

या स्तुत्य उपक्रमात सरपंच राजाराम दळवी,आण्णासाहेब पाटील हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री.भिसे, श्री.मनेर, सौ. भिलारे, सौ.गुरव, तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. कणसे, निकम, श्री.बोरसे यांच्यासह शालेय विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खडक, मातीच्या गोण्या, झाडांच्या फांद्या यांच्या सहाय्याने ओढ्यावर बांध घालण्यात आला. हा उपक्रम राबवताना विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसत होते. निसर्गासाठी काम करणे हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे, अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

यावेळी ग्रामस्थांनी शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक करत भविष्यातही अशा पर्यावरणपूरक उपक्रमांत पुढाकार घेण्याचा निर्धार व्यक्त केला. गावातील युवकांनीही पुढे येत अशा उपक्रमांसाठी कायम साथ देणार असल्याचा विश्वास दिला. जलसंधारणाच्या या विधायक कामाने म्हाते खुर्द गावात एकजुटीची, पर्यावरणप्रेमाची आणि सामाजिक जबाबदारीची नवी प्रेरणा निर्माण केली आहे. निसर्गासाठी लहान हातांनी उचललेले हे पाऊल गावासाठी मोठा आधार ठरणार आहे. पंचायत समिती जावलीचे गटविकास अधिकारी पाटील, विस्तार अधिकारी माने व ग्रामविकास अधिकारी सौ.दळवी यांचे मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री पंचायत राज अभियानांतर्गत म्हाते खुर्द गावाने उचलले हे पाऊल अभियानाची शान वाढवणारे आहे.

# सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ.तारुलता धानके यांचा ग्रामस्थांनी केला सत्कार

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१०, शहापूर (ठाणे) :** गेली ३३ वर्षे जिल्हा परिषद ठाणे यांच्या माध्यमातून आरोग्य सेवा देणाऱ्या डॉक्टर तरुलता धानके नियत वयोमानानुसार नुकत्याच सेवानिवृत्त झाल्या. डॉ.धानके या शहापूर तालुक्यातील नांदगावच्या असून त्यांनी जिल्ह्यत अनेक ठिकाणी आरोग्य सेवा केली होती. त्याच बरोबर कोव्हिड काळात देखील त्यांनी ऊत्कृष्ठ रुग्ण सेवा केली होती. सेवानिवृत्तीच्या निमित्ताने नांदगाव ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यासाठी कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. गावातील ज्येष्ठ मार्गदर्शक दामोदर दगडू धानके यांच्या शुभहस्ते डॉक्टर तरुलता व त्यांचे पती सुनील रमेश धानके यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी उपसभापती महेश धानके, सेवानिवृत्त मुख्याध्यापक र.मु.धानके, हिराजी धानके भोलानाथ धानके, विष्णू धानके, अनंता धानके व्यासपीठावर उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना डॉक्टर तरुलता धानके यांनी हा सन्मान माझ्यासाठी प्रेरणादायी असून घरच्या लोकांनी केलेल्या सत्काराची किंमत अनमोल असल्याचे सांगून गावच्या विकासासाठी मी सतत कार्यशील राहील असे आश्वासन त्यांनी ग्रामस्थांना दिले.यावेळी माजी उपसभापती महेश



धानके, सेवानिवृत्त मुख्याध्यापक र.मु. धानके, मुख्याध्यापक बी.के.धानके, संजय महाराज धानके,ऋषि धानके, सचिन धानके, देविदास धानके, गुलाब धानके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय धानके गुरुजी यांनी तर आभार प्रदर्शन संकेत धानके यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंकज धानके, रोशन धानके, सचिन धानके,वैभव दवणे,विठ्ठल धानके,चेतन धानके व गावातील तरुणांनी विशेष मेहनत घेतली. यावेळी कार्यक्रमास गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१०, सोलापूर :** वैभव जवळकोटे यांच्या संकल्पनेतून आणि तग सोशल फाऊंडेशन तसेच शिवराज्य प्रतिष्ठान यांच्या सौजन्याने, अमोल बापू शिंदे आणि अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर शिवसेना कार्यालय, बुरुडकर टॉवर येथे पार पडले. या शिबिरात प्रभाग क्र.२३ मधील तब्बल २९८ नागरिकांनी सहभाग नोंदवला. शिबिराचे उद्घाटन सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरा दरम्यान नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच मोतीबिंदू निदान झालेल्या रुग्णांसाठी शस्त्रक्रियेसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली. आवश्यक औषधोपचार आणि चष्मे मोफत वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास अमोल बापू शिंदे, अमर दादा पाटील, सचिन चव्हाण, माजीद बागवान, महादेव पडसलगी, सचिन शाबादे, गणेश दस्तापुरे, रोहन शेलार, आशिष मगर, रोहित तरंगे, विकास पाटील, विशाल कांबळे, महेश टिळे तसेच वैभव जवळकोटे मित्र परिवार उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनी अशा उपक्रमांमुळे समाजात आरोग्य जागरूकता वाढीस लागते, असे मत व्यक्त केले.

# नाविन्यपूर्ण कल्पना असणाऱ्या प्रत्येकाला नवउद्योजक बनण्याची संधी – मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, मुंबई :** भारतातील सर्वाधिक नोंदणीकृत स्टार्टअप्स महाराष्ट्रात असून यातील ४५ टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली आहेत, ही अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्र हे देशाचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल' असल्याचे सांगून भारताच्या पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याच्या उद्दिष्टात महाराष्ट्राचा आणि त्यातही महिला उद्योजकांचा मोठा वाटा असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर तरुणांच्या मनातील प्रत्येक कल्पना ही नाविन्यता असून स्टार्टअप्सच्या या काळात प्रत्येक व्यक्तीला नवउद्योजक बनण्याची संधी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या 'इनोव्हेशन महाकुंभ २०२५' चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जुहू येथील विद्यापीठ परिसरात झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. महिला शिक्षणाचे महत्त्व जाणून महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरू करणाऱ्या भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठामार्फत केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण




विभागाच्या सहकाऱ्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव आर्मस्ट्राँग पामे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.उज्वला चक्रदेव, 'नॅक'चे अध्यक्ष प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, ब्रिटनमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता, त्या काळात भारतरत्न महर्षी कर्वे यांनी १९१६ मध्ये महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आज आपण महिला सक्षमीकरण आणि नवकल्पनांच्या नव्या युगात प्रवेश केला आहे. राज्य शासनाने नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी धोरण तयार केले आहे. तरुणांच्या स्वप्नांना पंख देण्याची सरकार आणि विद्यापीठांची भूमिका असून राज्य शासन प्रत्येक टप्प्यावर नवउद्योजकांना साहाय्य करीत आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, आज नवकल्पनेतून केवळ नवे उत्पादन नव्हे, तर जीवन अधिक सुलभ केले जात आहे. एखादी कल्पना जेव्हा बाजारपेठेत रूपांतरित होते, तेव्हा ती अर्थव्यवस्थेला गती देते. कृत्रिम बुद्धीमत्ता आणि डेटा ॲनालिटिक्समुळे आता नव्या कल्पनांना वेग मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'स्टार्टअप इंडिया' उपक्रमामुळे आज भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप इकॉनॉमी बनला असून लवकरच दुसऱ्या क्रमांकावर पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात महिला उद्योजकांनी विकसित केलेल्या नवकल्पनांचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी प्रदर्शनाची पाहणी करून सर्व नवोन्मेषकांचे अभिनंदन केले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी वैद्यकीय, कृषी आणि वाहतूक व्यवस्थापन क्षेत्रातील उत्कृष्ट तीन स्टार्टअप कल्पनांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्री इन्क्युबेशन सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी राज्यात शिक्षण आणि नाविन्यता क्षेत्रात वेगाने काम होत असल्याचे सांगून येणाऱ्या काळात महाराष्ट्र या क्षेत्रात प्रथम क्रमांकावर असेल, असा विश्वास व्यक्त केला. शिक्षण आणि नावीन्यता क्षेत्रात महिलांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा उल्लेख करून शासन एसएनडीटी विद्यापीठाच्या पाठीशी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.उज्वला चक्रदेव यांनी प्रास्ताविकाद्वारे 'इनोव्हेशन महाकुंभ २०२५' बाबत माहिती दिली.

### धनंजय मुंडेविरोधात चौकशीची मागणी; संभाजी ब्रिगेडचे निवेदन



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१०, बार्शी (सोलापूर) :** संभाजी ब्रिगेड सोलापूर जिल्हाध्यक्ष आनंद काशीद यांनी राज्याचे गृहमंत्री, देशाचे गृहमंत्री आणि पंतप्रधान यांना निवेदन देऊन धनंजय मुंडे यांच्याविरोधात चौकशीची मागणी केली आहे. काशीद यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी तळागाळातील समाजाच्या आरक्षणासाठी आणि शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढा दिला आहे. मात्र, त्यांच्या कार्यात अडथळा आणण्याचा कट रचल्याचा आरोप त्यांनी धनंजय मुंडे यांच्यावर केला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी मुंडे यांच्या आमदारकीचा राजीनामा घेऊन त्यांच्यावर सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. या निवेदनावेळी विक्रम बापू घाईतिडक, रवींद्र मोठा, अभिजीत मोरे, शोएब भाई सय्यद यांच्यासह विविध समाजातील बांधव उपस्थित होते.

### सार्ड संस्था तर्फे पक्षी निरीक्षण कार्यक्रम

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** सार्ड संस्था, चंद्रपूर तर्फे पक्षी सप्ताहनिमित्त दिनांक ०९ नोव्हेंबर २०२५ ला सकाळी ७ वाजता जुनोना तलाव परिसर येथे पक्षी निरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ वन्यजीव अभ्यासक मारुती चित्तमपल्ली व ज्येष्ठ पक्षीशास्त्रज्ञ डॉ.सलीम अली यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून राज्यात ५ ते १२ नोव्हेंबर या काळात पक्षी सप्ताह साजरा केला जातो. राज्यातील जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धनाच्या दृष्टीने निसर्गातील प्रत्येक घटकाचे महत्त्व विशद व्हावे, लोकजागृती व्हावी, हे यामागचे उद्दिष्ट आहे. या पक्षी निरीक्षणात पानकवळा, हूदहूद, धीवर, माळ भिंगरी, वेडा राघू, सातभाई, टकाचोर, पोपट, हरोळी, शराटी, कोतवाल, होला, बुलबुल, मैना, बगळा, दयाळ, टिटवी, बदक, तुतारी, मनोली इत्यादी अनेक पक्ष्यांच्या नोंदी घेण्यात आल्या. या कार्यक्रमाकरिता सार्ड अध्यक्ष भाविक येरगुडे, ॲड. विलास माथनकर, आर्किटेक्ट रवी पचारे, नितीन डोंगरे, महेंद्र राळे, सचिन ढेंगळे, प्रवीण राळे, सचिन धोटे, मेश्राम, कांबळे, रितेश ढवळे, नम्रता डोंगरे, वनश्री मेश्राम, शिंदे, श्रीअंश येरगुडे यांनी सहभाग घेऊन निसर्गाच्या सानिध्यात आनंद घेतला.